# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

## प्रसिध्दीपत्रक

**स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर इन्स्ट्रक्टर अॅण्ड स्टुडंटस परीक्षा (GCC-SSD-CTC) जानेवारी -२०१९ निकाल.**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर इन्स्ट्रक्टर अॅण्ड स्टुडंटस परीक्षा (GCC-SSD-CTC) दि. २५/०१/२०१९ रोजी परीक्षा राज्यातील एकूण ३५ केंद्रावरुन ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आली.

दि. २६/०४/२०१९ रोजी सदर परीक्षेचा निकाल घोषीत करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांना गुणपत्रकाची ऑनलाईन प्रिंट घेता येईल

विद्यार्थ्यांची मूळ प्रमाणपत्रे / गुणपत्रके व निकालाच्या प्रती सर्व जिल्हयांचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद सर्व व मुंबईसाठी विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग, बालभवन, चर्नी रोड, मुंबई यांचे कार्यालयामार्फत संबंधित संगणक टंकलेखन संस्थांना वितरीत करण्यात येतील. विद्यार्थ्यांना त्यांची प्रमाणपत्रे/गुणपत्रके यथावकाश संगणक टंकलेखन संस्थामधून कार्यालयीन वेळेत मिळतील.

गुणपडताळणी व उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतीसाठी निकाल जाहीर झालेल्या दिनांकापासून १० दिवसांत परीक्षार्थीने संस्थेतून विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. गुणपडताळणीसाठी प्रति विषय रु. १००/- व उत्तरपत्रिका छायाप्रती मिळण्यासाठी प्रति विषय रु. ४००/-ऑनलाईन पध्दतीने बँक ऑफ इंडियाच्या(BOI) खाते क्र. ०५००१०२१०००००३५ वर संस्था login ध्दारे दिनांक ०६/०५/२०१९ पर्यंत भरावेत. याबाबतच्या सविस्तर सूचना परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर देण्यात आल्या आहेत.

### निकालाची संक्षिप्त माहिती

| परीक्षेचे नांव | परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थी | उपस्थित | अनुपस्थित | उत्तीर्ण | अनुत्तीर्ण | राखीव | शेकडा निकाल (उपस्थिती अनुसरुन) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| जी.सी.सी.एस.एस. डी-सी.टी.सी. (इंग्रजी) | ९०६ | ७०८ | १९८ | ३३७ | २७६ | ९५ | ४७.५९% |

(तुकाराम सुपे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ४११ ००१